मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# इंद्रायणी साहित्य संमेलनाचे श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते उद्घाटन

## दादाभाऊ गावडे संमेलनाध्यक्ष तर वंदना आल्हाट स्वागताध्यक्ष : तिसऱ्या इंद्रायणी साहित्य संमेलनाचे उद्घाटन रविवारी (दि.5 ) सकाळी आठ वाजता

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथे इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या इंद्रायणी साहित्य संमेलनाचे उद्घाटन रविवारी (दि.५ ) सकाळी आठ वाजता, देहू आळंदी रस्त्यावरील कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्य नगरी, जय गणेश बँक्वेट हॉल, मोशी येथे होणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक दादाभाऊ गावडे संमेलनाध्यक्ष पद भूषवणार आहेत. तर स्वागत अध्यक्ष म्हणून वंदना हिरामण आल्हाट यांची निवड करण्यात आली आहे अशी माहिती इंद्रायणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर, सचिव रामभाऊ सासवडे आणि निमंत्रण अरुण बोऱ्हाडे यांनी दिली.




बुधवारी मोशी नागेश्वर मंदिर, येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष डॉ. सीमा काळभोर, कार्याध्यक्ष सोपान खुडे, सदस्य डॉ. पौर्णिमा कोल्हे, एव्हरेस्टवीर श्रीहरी तापकीर व इतर सदस्य उपस्थित होते. उद्घाटनापूर्वी श्री नागेश्वर महाराज मंदिर ते कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्य नगरी (संमेलन स्थळ) पर्यंत सकाळी आठ वाजता ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे सदस्य अ‍ॅड. माधवी निगडे यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनास संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. शिवाजीराव मोहिते, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाहक सुनिताराजे पवार, शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. अरुण दातार, आमदार महेश दादा लांडगे, आमदार बाबाजी काळे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. यावेळी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते अक्षर इंद्रायणी या स्मरणिकेचे आणि काल भवताल या कथासंग्रहाचे श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच इंद्रायणी साहित्य परिषदेचा यशवंतराव चव्हाण प्रज्ञावंत साहित्य पुरस्कार डॉ. श्रीपाल सबनीस यांना प्रदान करण्यात येणार आहे. आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते "स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा" या क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. सकाळी दहा वाजता "ज्ञानेश्वरी - काळाची गरज" या परिषदेचे उद्घाटन डॉ. आरती दातार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या परिसंवादात संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक हभप डॉ. नारायण महाराज जाधव, हभप अ‍ॅड. यशोधन महाराज साखरे, योगी निरंजनाथ गुरु शांतिनथ, ज्ञानेश्वरीचे ज्येष्ठ अभ्यासक रामदास जैद आदी सहभाग घेणार आहेत. या परिसंवादाचे सूत्रसंचालन प्रा. दिगंबर ढोकले तर समन्वयक म्हणून डॉ. सीमा काळभोर काम आहे.

दुपारी दोन वाजता संमेलनाध्यक्ष दादाभाऊ जयवंत गावडे यांची ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र घावटे प्रकट मुलाखत घेणार आहेत. दुपारी तीन वाजता, डॉ. सदानंद मोरे यांची संदीप तापकीर प्रकट मुलाखत घेणार आहेत. सायंकाळी पाच वाजता "दुर्ग भटकंती" या अरुण बोराडे यांनी लिहीलेल्या पुस्तकाचे प्रकाशन निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. माधवराव सानप यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यानंतर समारोप सत्रात ज्येष्ठ उद्योजक रामदास काकडे यांच्या हस्ते भूमिपुत्र पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. यावेळी लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड अध्यक्ष राजन लाखे, सूत्रसंचालक श्रीकांत चौगुले आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी वैद्यकीय सेवा डॉ. अनिल कुमार रोडे, प्रशासन सेवा कार्य संजय गोपाळ शिंदे, इतिहास संशोधन दत्तात्रय दगडू फुगे, अग्निशमन सेवा कार्य सुनील तानाजी गिलबिले, प्रशासकीय सेवा परीक्षा स्मिता प्रतीक थोरवे, प्रो कबड्डी खेळाडू अनुज काळूराम गावडे, वैद्यकीय संशोधन कार्य डॉ. मधुरा मल्हारी काळभोर, युवा कीर्तनकार हभप विठ्ठल महाराज गवळी, हभप संग्राम बापू भंडारे, हभप मंगेश महाराज सावंत, साहित्य व समाजसेवा दत्तात्रय विघ्नहर अत्रे, सीए परीक्षा उत्तीर्ण सम्यक राहुल धोका आणि सिद्धांत राहुल धोका आदींना "भूमिपुत्र पुरस्कार २०२४" देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

सायंकाळी ७:३० वाजता, शिवांजली साहित्य परिषदेचे प्रवर्तक शिवाजीराव चाळक यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन होणार आहे. यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक सुरेश कंक, संतोष घुले, समन्वयक डॉ. पौर्णिमा कोल्हे आदी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

# वेग वाढल्यास दंड, कमी केल्यास अपघात

## द्रुतगती'वरील घाट परिसरात मोजक्याच ठिकाणी वेगमर्यादेचे फलक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगतीवरील घाट परिसरात वेग मर्यादा दर्शविणारे फलक मोजक्याच ठिकाणी बसविल्याने चालकांना वाहनाचा वेग अचानकपणे कमी करावा लागत आहे; मात्र मागून आलेल्या वाहनांच्या वेगावर आवर घालणे मुश्किल होते व अशाप्रसंगी अपघाताच्या घटना घडतात; तसेच वाहन चालकांना वाहतूक नियमभंग केल्याने आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे.



द्रुतगती मार्गावर हलक्या वाहनांसाठी वेग मर्यादा 100 किमी प्रतितास, तर इतर वाहनांसाठी 80 किलो मीटर प्रतितास आहे; मात्र भरधाव जाणाऱ्या वाहनचालकांना घाट परिसरात अचानकपणे प्रतितास 60/ 40 ची वेग मर्यादा असल्याचे फलक दिसल्याने वाहनांवर नियंत्रण आणणे कठीण होते. वेग कमी केल्यास मागून आलेली वाहने धडकण्याचे प्रकार घडत आहेत; तसेच वाहनांचा वेग कमी न केल्यास वाहतूक नियमाचे उल्लंघन केल्याने नाईलाजास्तव दोन हजार रूपये दंड भरावा लागत आहे.

द्रुगगती मार्गावर वेग मर्यादेबाबतचे फलक अगदी कॅमेराजवळ ; तसेच मोजक्याच ठिकाणी लावल्याने वाहन चालकांना याचा अंदाज येत नाही. परिणामी वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याने वाहन चालकांना दंड भरावा लागत आहे. त्यामुळे द्रुतगतीवरील घाट परिसरात जागोजागी वेग मर्यादेबाबत सूचना फलक आणि डिजिटल बोर्ड लावण्यात यावेत अशी मागणी चालकांकडून करण्यात येत आहे.

# पीएमआरडीएकडून वर्षभरात 350 बांधकामांचे सर्वेक्षण

## अनधिकृत असलेली सुमारे 95 बांधकामे, होर्डिंग हटविण्याची कार्यवाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वतीने अनधिकृत बांधकामे, होर्डिंग हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. पीएमआरडीए प्रशासनाच्या गेल्या वर्षभरात सुमारे 350 बांधकामांचे सर्वेक्षण केले आहे. यामध्ये अनधिकृत असलेली सुमारे 95 बांधकामे, होर्डिंग हटविण्याची कार्यवाही प्रशासनाने केली आहे. त्यामध्ये 24 होर्डिंगचा समावेश आहे. यापुढेही ही कारवाई सुरुच ठेवली जाणार आहे. त्याचप्रमाणे, बांधकामांचे सर्वेक्षणदेखील केले जाणार आहे, असे पीएमआरडीए प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.



दरम्यान, नोटीस दिल्यानंतरही बांधकाम सुरू ठेवून नियमभंग करणाऱ्या 5 जणांवर फौजदारी कारवाई केली आहे. येथून पुढे अनधिकृत बांधकामांच्या विरोधात कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार आहे. पीएमआरडीए हद्दीतील सर्व अनधिकृत होर्डिंगसह अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण सुरू आहे. तसेच, अशी अनधिकृत बांधकामे हटविण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या सह-आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

पीएमआरडीए प्रशासनाने यापूर्वी लोणीकंद, केसनंद येथील अनधिकृत होर्डिंगसह बांधकाम काढून टाकले होते. त्याचप्रमाणे, अनधिकृत होर्डिंग, सोसायटीतील सदनिकाधारकांनी अनधिकृतपणे केलेले पत्राशेड क्रेन, गॅस कटर आणि मनुष्यबळाच्या साहाय्याने काढण्यात आले.

पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाधिकारी डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, तहसीलदार सचिन मस्के, राजेंद्र रांजणे, पोलिस निरीक्षक महेशकुमार सरतापे, कनिष्ठ अभियंता यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली कारवाई केली जात आहे.

# जागा वाढीसाठी राज्य सरकारच्या विरोधात 'एक्स' वॉर

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र गट- ब व गट-क (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षेसाठी एक वर्षासाठी वयोमर्यादेत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र गट- ब व गट-क (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षेसाठी एक वर्षासाठी वयोमयदित वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, त्यानुसार विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. या वयमर्यादेच्या निर्णयासाठी विद्यार्थ्यांना संघर्ष करावा लागला आहे. त्यानंतर आता राज्य सरकारने या गटाच्या रिक्त जागांचा सामावेश याच जाहिरातीत करावा, या मागणीकडे लक्ष वेधून घेण्यासाठी राज्यातील विद्यार्थ्यांनी राज्य सरकारच्या विरोधात ' एक्स वॉर करण्यात आले.



राज्यातील बेरोजगारांची संख्या लक्षात घेता जाहीरातीत गट ब च्या किमान एक हजार आणि गट क च्या किमान पाच हजार रिक्त जागांचा सामावेश करावा, या मागणीसाठी राज्यातील विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एक्स या समाज माध्यमावर विद्यार्थ्यांनी राज्य सरकारच्या विरोधात एक प्रकारे आंदोलनच केले. राज्यात गट ब च्या पोलिस उपनिरीक्षक या पदाच्या राज्यात तीन हजार जागा रिक्त आहेत. त्यानंतरही केवळ २१६ जागांचे मागणी पत्र एमपीएससीला पाठवण्यात आले. यावर विद्यार्थ्यांची नाराजी असताना ४४१ पदांचे मागणीपत्र पाठवले होते. त्यानंतरही त्यात कमी कपात करुन २१६ जागांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.

२०२३ मध्ये ३७४ जागांची जाहिरात आली होती. त्यात फक्त १९९ उमेदवार निवडले जाण्याची शक्यता आहे. यावरुन एकूण १७५ पदे रिक्त राहणार आहेत. याचा विचार करुन किमान यामध्ये ४०० पदे आणखी वाढवावीत असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. लिपिक टंकलेखक ही पदे शासनाने दोन वर्षात १२ हजार भरण्याचे जाहीर केले होते. मागच्या वर्षी ७००७ भरल्या आहेत. उर्वरित ५ हजार यावर्षी अपेक्षित असताना फक्त ८०३ जागा देण्यात आलेल्या आहेत. त्यातील जलसंपदामध्ये १३०० आणि मुद्रांक व नोंदणी विभागातील ५३१ जागा रिक्त आहेत.

या विभागातील जागा भरण्यासाठी याच विभागातील अधिकारी आणि कर्मचारी विरोध करत आहेत. त्यामुळे ही पदे भरली जात नाहीत. महसूल विभागात १ हजार, कृषि विभाग ८०० जागा, कौशल्य व रोजगार विभाग ६०० जागा, शिक्षण विभागात लिपिक टंकलेखकच्या ७७० जागा रिक्त आहेत. दरम्यान, राज्यकर निरीक्षकच्या २०९ जागा आल्या आहेत. त्यात वाढ करुन त्या ४०० कराव्यात. सहायक कक्ष अधिकारी पदाच्या ५५ जागा आहेत. त्या २०० पर्यंत करण्यात याव्यात.

अशी मागणी विद्यार्थांची आहे. असा गंभीर आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. तसेच इतर गट क च्या पदांच्या अनेक जागाही रिक्त आहे. त्यामुळे या जाहिरातीत आणखी रिक्त पदांचा समावेश करण्यात यावा, यासाठी विद्यार्थ्यांकडून राज्य सरकारला जागांमध्ये वाढ करण्यासाठी साद घातली जात होती. मात्र आता विद्यार्थ्यांनी राज्य सरकार रोष व्यक्त केला असून विद्यार्थ्यांनी थेट सरकारच्या विरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

> **शासनाच्या विविध विभागात अनेक जागा रिक्त आहेत. याची माहिती माहिती अधिकारातून पुढे आली आहे. परंतु एमपीएससीकडे रिक्त जागा भरण्याबाबतचे मागणीपत्र पाठवले जात नाही. असे दिसून येत आहे. नेमका हा प्रकार कोणाच्या भल्यासाठी केला जात आहे, याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन शासनाने जागांमध्ये वाढ करण्याची गरज आहे. हे सरकार तरुणांच्या हिताचे निर्णय घेईल, असा विश्वास आहे. प्रत्येक वेळी मागण्यांसाठी सरकारने विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरवण्याची वेळ येऊ देऊ नये.**
>
> **- महेश घरबुडे, अध्यक्ष, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असोसिएशन.**

# पुण्यात पाच माजी नगरसेवक भाजपच्या वाटेवर?

## नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच पुण्यात राजकीय भूकंपाची चिन्हे आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

नव्या वर्षाच्या सुरूवातीलाच पुण्यात राजकीय भूकंपाची चिन्हे आहेत. एका राजकीय पक्षाचे पाच माजी नगरसेवक भाजप मध्ये प्रवेश करणार असून या नगरसेवकांनी नुकतीच पुण्यातील एका मोठया राजकीय नेत्यासोबत भाजपच्या राज्यातील नेत्यांची मुंबईत जावून भेट घेतली आहे. त्यानंतर लवकरच हे नगरसेवक मुंबई अथवा पुण्यात भाजप मध्ये प्रवेश करणार आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणूकांच्या पाठोपाठ राज्यात पुढील काही महिन्यात राज्यात रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका होण्याची शक्यता आहे. त्यातच, राज्यात लोकसभा निवडणूकीत पिछेहाट झालेल्या भाजपला विधानसभा निवडणूकीत मतदारांनी पसंती दिली असून पुण्यातही भाजपला शत प्रतिशत यश मिळाले असून भाजपच्या सर्व जागा निवडून आलेल्या आहेत.

त्यामुळे, २०१७ मध्ये महापालिकेवर निर्विवाद यश मिळालेल्या भाजपची सत्ता महापालिकेतही कायम राहण्याची शक्यता असल्याने या बडया राजकीय पक्षाच्या नगरसेवकांनी धसका घेतला असून भाजपमध्ये जाण्याची तयारी दर्शविली आहे. त्यासाठी, या पाच नगरसेवकांनी नुकतीच मुंबई वारी केली असून त्यांना पक्षात पद देण्यासह, महापालिका निवडणूकीचे तिकिटही देण्याची तयारी भाजपकडून दर्शविण्यात आली आहे.

त्यामुळे, महापालिका निवडणूकीत भाजप विरोधात लढण्यापेक्षा त्यांच्या सोबत जाण्याची भूमिका या माजी नगरसेवकांनी घेत भाजपची वाट धरली असून पुढील काही दिवसात ते भाजपमध्ये जाहीर प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यात काही विधानसभेसाठी इच्छूक असलेल्या माजी नगरसेवकांचाही समावेश असून दोन महिला तर तीन पुरूष माजी नगरसेवकांचा समावेश आहे.

# नव्या वर्षातच मिळणार अग्निशमनला नवी वाहने

## दोन वर्षांपासून फायर इंजिन खरेदी नाही

**पुणे | प्रतिनिधी**

शासनाकडून गेल्या २४ वर्षात चार वेळा महापालिकेची हद्दवाढ करण्यात आली. त्यामुळे पुणे हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने राज्यातील सर्वात मोठे शहर बनले आहे. मात्र, शहरात आलेल्या आपत्तीचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी असलेल्या अग्निशमन दलाकडे केवळ २२ आगीचे बंब (फायर इंजिन) असून मागील दोन वर्षांपासून नवीन बंबाची खरेदीच झालेली नाही.



दोन वर्षापूर्वी या विभागाकडे ४९ बंब होते. मात्र, केंद्र शासनाने १५ वर्षे जुनी झालेली शासकीय वाहने भंगारात काढण्याचे आदेश दिल्याने या विभागाकडील तब्बल २७ बंब आर्युमान संपल्याने सेवेतून हटविण्यात आले.

त्यामुळे केवळ २२ बंबावरच शहराचा कारभार सुरू आहे. तर, ही कमी असलेल्या वाहनांची खरेदी दोन वर्षापासून सुरू असून अद्यापही या खरेदीस मुहूर्त लागलेला नाही. त्यामुळे नवीन वर्षात तरी अग्निशमन विभाग सक्षम होणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

शहरात विकास आराखड्यातील निकषांनुसार प्रत्येक एक लाख नागरिकांमध्ये एक अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. तर, पुणे शहराची लोकसंख्या सुमारे ७० लाखांच्या आसपास गेल्याने शहरासाठी ७० केंद्राची गरज आहे. मात्र, प्रत्यक्षात महापालिकेची शहरभर केवळ २० अग्निशमन केंद्रच सुरू आहेत. तर, आणखी पाच केंद्र तयार असून त्यामध्ये चांदणी चौक, बाणेर (स्मार्ट सिटी), खराडी, महंमदवाडी, धायरी (पारी कंपनी जवळ) या केंद्राचा समावेश आहे. मात्र, ही केंद्र सुरू करायची झाल्यास महापालिकेस आणखी पाच वाहनांची खरेदी करावी लागणार असून मागील दोन वर्षांपासून ही खरेदी प्रक्रीया सुरू आहे.

अग्निशमन विभागाकडे शहरात आपत्तीची स्थिती उद्भवल्यास आग नियंत्रण तसेच इतर तातडीच्या मदतीसाठीची जबाबदारी आहे. मात्र, पुण्यात रस्त्यावर सांडलेल्या ऑईल पासून झाडांवर अडकलेले पक्षी, प्राणी वाचविणे, साप पकडणे, राजकीय कार्यक्रमांसाठी मैदानांवर पाणी मारणे, शहरात कचऱ्याला आग लागणार नाही याची दक्षता घेणे अशीही कामे केली जातात. या विभागास गेली अनेक वर्षे पुरेसे मनुष्यबळही नव्हते. आता, खासगी मनुष्यबळ उपलब्ध झालेले असले तरी वाहनेच नसल्याने हे कर्मचारी काम करणार तरी कसे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# शाळांनी अग्निशामक सुरक्षेची पूर्तता करा

## अग्निशमन विभागाकडून शहरातील सर्व शाळांना अग्निप्रतिबंधक उपाययोजना करण्याच्या सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून शहरातील सर्व शाळांना अग्निप्रतिबंधक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याबाबतचे पत्र शाळांना पाठविण्यात येणार आहे. उपाययोजनांसाठी १५ दिवसांची मुदत देण्यात आली असून, मुदतीत उपाययोजना न केल्यास शाळांना नोटिसा दिल्या जाणार आहेत. नोटिसीनंतरही दुर्लक्ष केल्यास संबंधित शाळांच्या विरोधात कारवाई होणार आहे.

शहरातील रुग्णालयांपाठोपाठ शाळांमधील अग्निसुरक्षेची काय व्यवस्था आहे, याची तपासणी अग्निशमन विभागाकडून केली जाणार आहे. शाळांनी अग्निप्रतिबंधक उपाययोजना कराव्यात. उपाययोजना केल्या असतील तर त्याची माहिती महापालिकेला द्यावी. यासंदर्भात शहरातील ६७३ शाळांना पत्र दिले जाणार आहे. त्यानंतर संबंधितांना आवश्यक कार्यवाही करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. या मुदतीमध्ये आगीपासून सुरक्षेसाठी आवश्यक उपकरणे व अन्य बाबी बसविणे, बसविलेली उपकरणे सुस्थितीत आहे का, याची तपासणी करणे गरजेचे असल्याचे अग्निशमन विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले.

उपाययोजना करण्यासाठी दिलेली मुदत संपल्यानंतर शाळांना नोटिसा बजाविल्या जाणार आहेत. त्यानंतरही शाळांकडून याबाबत दुर्लक्ष केल्यास अग्निसुरक्षा अधिनियमानुसार संबंधित शाळांच्या विरोधात कारवाई करण्यात येणार असल्याचे लोणकर यांनी स्पष्ट केले. दरम्यान, महापालिका अग्निशमन विभागाने आतापर्यंत अग्निप्रतिबंधक उपाययोजनांबाबत शहरातील विविध ३८१२ व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा बजाविल्या आहेत. त्यांपैकी ४८२ आस्थापनांची अग्निशमन दलाच्या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. तर, १७२ जणांना व्यवसाय अग्निसुरक्षा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

शहरात आगीच्या सातत्याने होत असलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शाळांनी अग्निप्रतिबंधक उपाययोजना केल्या आहेत का, अग्निसुरक्षा पूर्तता प्रमाणपत्र घेतले आहे का, याची पडताळणी करण्यात येणार आहे. त्यासाठी शाळांना पत्र पाठविली जाणार असल्याचे अग्निशमन विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले.



### तीन हजार 812 शाळांना नोटिसा..

» महापालिका अग्निशमन दलाने आत्तापर्यंत अग्निसुरक्षा प्रमाणपत्रासाठी शहरातील विविध तीन हजार ८१२ आस्थापनांना नोटिसा बजावल्या आहेत. ४८२ आस्थापनांची अग्निशमन दलाच्या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली, तर १७२ जणांना व्यवसाय अग्निसुरक्षा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

# भोसरी पोलीस ठाणे राज्यात चौथ्या क्रमांकावर

## गुन्हेगारीला घातला प्रतिबंध : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाची मान उंचावली

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील गुन्हेगारीला प्रतिबंध घालणाऱ्या, कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या पोलीस ठाण्यांमध्ये पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील भोसरी पोलीस ठाण्यानेही बाजी मारली आहे. राज्यातील पाच सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांमध्ये भोसरी पोलीस ठाण्याने चौथा क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे राज्य पोलीस दलात पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाची मान उंचावली आहे.

कायदा व सुव्यवस्था गुन्हे प्रतिबंध दोषसिद्धी यामध्ये सुधारणा व्हावी, यासाठी पोलीस ठाण्यांची निवड प्रक्रिया घेण्यात येते. देशपातळीवर १० सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांची निवड करण्याचा निर्णय केंद्रीय स्तरावर घेण्यात आला होता.

यासाठी राज्यातील पोलीस ठाण्यांची निवड देशपातळीवर करण्याच्या उद्देशाने ही निवड केली. यामध्ये राज्यातील पाच पोलीस ठाण्यांची निवड करण्यासाठी समित्यांची निवड केली होती. समितीच्या अहवालानुसार राज्यातील पाच सर्वोत्कृष्ट ठाण्यांची निवड झाली. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील शिवाजीनगर पोलीस ठाणे, नांदेड जिल्ह्यातील देगलूर पोलीस ठाणे, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील विरगाव पोलीस ठाणे, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील भोसरी पोलीस ठाणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ पोलीस ठाण्याची निवड झाली आहे.

भोसरी पोलीस ठाण्याला सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्याचा मान मिळण्याकरता पिंपरी-चिंचवडचे तत्कालीन पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, तत्कालीन सह आयुक्त संजय शिंदे, तत्कालीन अपर आयुक्त रामनाथ पोकळे, भोसरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर जाधव यांनी विशेष प्रयत्न केले. पोलीस ठाण्यांची कार्यक्षमता आणि कामगिरी, गुणवत्ता वाढवणे, दिलेल्या मर्यादेमध्ये उत्कृष्ट पद्धतीने काम करण्याबाबत या कार्यमूल्यांकनातून पोलिसांना प्रोत्साहन दिले जाते. गुन्हेगारीला प्रतिबंध आणि गुन्ह्यांचा तपास कायदा - सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने यातून पोलिसांना प्रेरणा मिळण्यास मदत होते.

पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासनासाठी भोसरी पोलीस ठाणे हे 'हेवी' पोलीस ठाणे आहे. तसेच संवेदनशील पोलीस ठाणे म्हणूनही या पोलीस ठाण्याची ओळख आहे. त्यामुळे संवेदनशील ते सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे म्हणून राज्यात नावलौकिक मिळवणाऱ्या भोसरी पोलीस ठाण्याची देशपातळीवरील दहा सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांमध्ये निवड होणार का, याकडे आता लक्ष लागून आहे.



> भोसरी पोलीस ठाण्याची निवड होणे ही अभिमानास्पद बाब आहे. तत्कालीन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी व अंमलदारांनी केलेल्या कामाचा हा सन्मान आहे. आणखी चांगले काम करण्यास यातून प्रेरणा मिळाली आहे.
>
> **- भास्कर जाधव, पोलीस उपअधीक्षक तथा तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भोसरी.**

> या सर्वोत्कृष्ट सन्मानामुळे पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचा बहुमान वाढला आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रोत्साहित करण्यासाठी हा सन्मान खूप मोलाचा ठरणार आहे.
>
> **- विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.**

# नववर्षात नळजोड तोडण्याची कारवाई

## महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी भरण्याकडे दुर्लक्ष करणे पुणेकरांना चांगलेच भोवणार




**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेडून वारंवार नोटिसा बजावूनही महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी भरण्याकडे दुर्लक्ष करणे पुणेकरांना चांगलेच भोवणार आहे. ज्या मिळकतधारकांनी थकबाकी भरलेली नाही, त्यांचे नळजोड तोडण्यात येणार आहे. त्यासाठी मध्यवर्ती झोनसह पाच परिमंडळ स्तरावर पाच पथके नेमण्यात आली असून, याची कारवाई उद्यापासून (१ जानेवारी) सुरू करण्यात येणार आहे. कर संकलन विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी ही माहिती दिली.

महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी १० हजार कोटींच्या वर गेली आहे. यात सुमारे साडेतीन लाख थकबाकीदार नियमित कर भरत नाहीत, तर २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी महापालिकेच्या अंदाजपत्रकात या विभागास २७२७ कोटींच्या करवसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत १९०० कोटींचा कर वसूल झाला आहे, तर थकबाकी वसुलीसाठी २ डिसेंबरपासून प्रशासनाने बँड पथकासह मिळकती सील करण्याची मोहीम हाती घेतली असून, आतापर्यंत सुमारे ७१ कोटी ४१ लाखांचा मिळकतकर वसूल झाला आहे. मात्र, त्यानंतरही अनेक थकबाकीदार महापालिकेची बिले भरण्यास तयार नाहीत, तसेच उडवाउडवीची कारणे देत महापालिकेची कारवाई टाळली जात आहे.

परिणामी महापालिकेने नव्या वर्षाच्या पहिल्या दिवसापासूनच कारवाईचा बडगा उभारण्याचा निर्णय घेतला असून, आता वसुली पथकांसोबतच १ प्लंबर व तीन बिगारी सेवक व त्या- त्या भागातील पेठ निरीक्षक असणार आहेत. थकबाकी न भरल्यास ताबडतोब नळजोड तोडले जाणार आहेत, तसेच जोपर्यंत बिलाची पूर्ण रक्कम भरली जात नाही, तोपर्यंत नळजोड पूर्ववत केला जाणार नाही.

### गावांचा राग पुणेकरांवर?

» महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये महापालिकेकडून आकारण्यात आलेल्या मिळकतकरास ग्रामस्थांचा विरोध आहे. त्यामुळे शासनाने या गावांमधील मिळकतकराची वसुली विधानसभा निवडणुकीच्या काही दिवस आधी थांबविली आहे. त्याचा फटका महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नास बसला आहे. ही रक्कम जवळपास ३०० ते ४०० कोटींची आहे. त्यामुळे या विभागाचे उत्पन्नाचे उद्दिष्ट पूर्ण होणार नसल्याचे चित्र आहे. तर शासन या स्थगितीबाबत कोणताही निर्णय घेण्यास तयार नाही. त्यामुळे महापालिकेकडून शहरातील थकबाकीदारांचे नाक दाबण्यास सुरुवात केली असून, मिळकती सील करण्यासोबतच आता त्यांचा पाणीपुरवठाही तोडला जाणार आहे.

# प्रजासत्ताक दिनाला आता उपक्रमांची जोड

## शालेय शिक्षण विभागाने शाळांमध्ये ध्वजवंदनानंतर विद्यार्थ्यांनी, गीत गायन आणि प्रभात फेरीचे निर्देश




**पुणे | प्रतिनिधी**

देशाची संस्कृती, इतिहास आणि भविष्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये अभिमान निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत येत्या प्रजासत्ताक दिनापासून (२६ जानेवारी) राज्यातील शाळांमध्ये उपक्रम राबवण्याचा आदेश देण्यात आला आहे. त्यात ध्वजावंदनानंतर प्रभात फेरी, भाषण स्पर्धा, नृत्य, खेळ असे उपक्रम राबवून प्रजासत्ताक दिन साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. या निर्णयानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये ध्वजवंदनानंतर विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत गायन, राज्यगीत गायन, भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे वाचन, देशभक्तिपर गीत गायन करावे. शाळेच्या परिसरात प्रभात फेरी काढावी. विद्यार्थ्यांकरिता स्वातंत्र्यसैनिक, देशभक्ती, लोकशाही अशा विषयांवर भाषण स्पर्धा आयोजित करावी. विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेल्या किंवा इतर कवींच्या देशभक्तिपर कवितांचे वाचन करावे. विद्यार्थ्यांकरिता देशभक्तिपर गाण्यांवर नृत्य स्पर्धा, देशभक्तिपर विषयांवर चित्रकला, निबंध स्पर्धा आयोजित करावी. विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे खेळ आयोजित करावेत. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तकला, चित्रकला इत्यादी कलांची प्रदर्शनी आयोजित करावी. संबंधित कार्यक्रम आयोजित करताना विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा विचार करावा.

या उपक्रमांसाठी गावातील स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, प्रतिष्ठित नागरिकांचा सक्रिय सहभाग घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. दिलेल्या सूचनांप्रमाणे शाळांकडून प्रजासत्ताक दिन साजरा होण्याबाबत संबंधित जिल्ह्याच्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षकांनी काळजी घेण्याचेही नमूद करण्यात आले आहे.

### शाळांमध्ये उपक्रमांचा अतिरेक

» शाळांमध्ये आधीच अनेक उपक्रम राबवावे लागत असल्याने शिक्षण विभागाच्या या सूचनांबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे. 'सक्ती करून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देता येत नाही. अलीकडे शाळांमध्ये उपक्रमांचा अतिरेक होतो आहे. आयत्या वेळी आणि वर्षभर भारंभार उपक्रम करण्यापेक्षा वर्षभरात करायच्या उपक्रमांचे वेळापत्रक निश्चित करावे. स्थानिक परिस्थितीनुसार त्यात बदल करण्याचे स्वातंत्र्य शाळांना असावे,' असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी मांडले. तर, २६ जानेवारीला अनेक शाळांमध्ये स्नेहसंमेलन असते. शासन निर्णयाने या उपक्रमांना वैधानिक रूप दिले आहे. सहशालेय उपक्रमांच्या नावाखाली वर्षभरात शाळांमध्ये होणाऱ्या उपक्रमांची संख्या बरीच जास्त आहे. त्यामुळे शिकण्या-शिकवण्याला वेळ मिळण्यासाठी वर्षभरातील उपक्रमांची संख्या मर्यादित करण्याची गरज आहे, असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले.